# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## चौधरी चरणसिंह, नरसिंह राव आणि स्वामीनाथन यांना सर्वोच्च सन्मान!

नवी दिल्ली दि.९ (वृत्तसंस्था)- भारत सरकारने एकाच वेळी तीन दिग्गजांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित केले आहे. चौधरी चरण सिंह, नरसिंह राव आणि एमएस स्वामीनाथन (मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार) यांना भारतरत्न पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्वीट करत याबाबतची माहिती दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एकापाठोपाठ एक तीन ट्वीट करत याबाबतची माहिती दिली. गेल्या आठवड्यात भारत सरकारने माजी उपपंतप्रधान लाल कृष्ण आडवणी यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित केले होते. एकाच आठवड्यात चार दिग्गजांना भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेय.

भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार आहे. एखाद्या क्षेत्रात असाधारण आणि सर्वोच्च कामगिरी केल्याबद्दल केंद्र सरकारकडून भारतरत्न पुरस्कार देण्यात येतो. राजकारण, कला, साहित्य, क्रीडा,विज्ञान क्षेत्रातील विचारवंत, शास्त्रज्ञ, उद्योगपती, लेखक आणि समाजसेवक यांना या पुरस्काराने गौरवण्यात येते. कृषी क्षेत्रात भरीव योगदानामुळे एमएस स्वामीनाथन यांना भारतरत्न (मरणोत्तर) पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेय.


(वर्ष ६३ वे अंक ५०) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार, दि.१० फेब्रुवारी २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


# राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करा-नाना पटोले

## फडणवीस अकार्यक्षम गृहमंत्री असल्याचा आरोप

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- देवेंद्र फडणवीस एक अकार्यक्षम, हतबल, निष्क्रिय व लाचार गृहमंत्री आहेत. त्यांना माणूस व कुत्र्यांमधील फरकही समजत नाही, अशा तिखट शब्दांत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शुक्रवारी अभिषेक घोसाळकर हत्याकांडावरून राज्य सरकारवर टीकेची झोड उठवली आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शुक्रवारी येथील टिळक भवनात पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी अभिषेक घोसाळकर यांच्या हत्याकांडासह गत काही दिवसांत घडलेल्या गुन्हेगारी स्वरुपाच्या घटनांवरून राज्य सरकारवर टीकेची झोड उठवली. तसेच महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करण्याची मागणीही केली.महाराष्ट्रात कायद्याचे तीन - तेरा वाजले आहेत. गुडांना कसलीच भिती राहिलेली नाही. कल्याणमध्ये पोलिस स्टेशनमध्ये गोळीबार, जळगाव, यवतमाळमधील गोळीबाराच्या घटनानंतर आता मुंबईत माजी नगरसेवकाची हत्या झाली आहे. ही महाराष्ट्रासाठी अत्यंत गंभीर व चिंतेची बाब आहे, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्र्यांचा 'वर्षा' बंगला तसेच मंत्रालयात गुडांचा वावर बिनदक्कितपणे सुरु आहे. तडीपार गुडांना राजाश्रय, पोलिस दलामधील राजकीय हस्तक्षेप व दबावामुळे पोलिसही हतबल आहेत. राज्यातील कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती चिंताजनक असून हे 'गुंडाराज' बरखास्त करुन राष्ट्रपती राजवट लागू करा, अशी मागणी यावेळी नाना पटोले यांनी केली.



ते पुढे म्हणाले की, राज्यात कायदा सुव्यवस्था बिघडली असतानाही गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांना त्याचे काहीच गांभिर्य नाही. 'गाडीखाली कुत्रा आला तरीही विरोधक गृहमंत्र्यांचा राजीनामा मागतील' असे बेजबाबदार वक्तव्य करुन त्यांनी आपल्या लाचारी व हतबलतेचे दर्शनच घडवले आहे. फडणवीस यांना माणूस व कुत्रा याच्यातील फरकही कळत नाही का? महाराष्ट्रात आता कायद्याचे राज्य राहिले नाही. भाजपा सरकारमुळे महाराष्ट्र गुन्हेगारीत देशात पहिल्या नंबरवर आहे हे ीं च्या अहवालात म्हटले आहे.

दरम्यान महाराष्ट्रात सरकार बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लागू करा अशी मागणी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी दिली आहे. तसेच गुंडांनी गुंडांसाठी चालवलेले राज्य म्हणजे महाराष्ट्र आहे असा हल्लबोलही संजय राऊत यांनी केला आहे. ठाकरे गटाचे माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. याप्रकरणी संजय राऊतांनी राज्य सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे.

यावेळी बोलतांना राऊत म्हणाले, ''महाराष्ट्रात माफिया राज पाहायला मिळत आहे. हे अपयश घटनाबाह्य मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आहे. राज्यात दररोज हत्या, दरोडा सारख्या घटना घडत आहेत. सरकारी पैशाने गुंडगिरी वाढवली जात आहे. शिंदेंच्या टोळीत पोलिस आणि गुंड एकत्र काम करतात. राज्यातील अनेक सरकारी कामे गुंडांना दिले जातात'', असे गंभीर आरोप संजय राऊत यांनी केले आहेत.

## गाडीखाली श्वान आले तरी राजीनामा मागतील -फडणवीस

उद्या एखाद्या गाडीखाली श्वान आला तरी विरोधक माझा राजीनामा मागतील असे म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. तसेच घडलेली घटना ही अतिशय गंभीर असून त्याचे राजकारण करणे देखील योग्य नाही असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

ठाकरे गटाचे तरुण नेते अभिषेक घोसाळकर यांची गुरुवारी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. यानंतर राज्यात कायदा आणि सुव्यवस्था आहे का? असा प्रश्न उपस्थित करत विरोधकांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. यावरच फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली.

फडणवीस बोलतांना म्हणाले, ''घोसाळकर आणि मॉरिस काही वर्षे एकत्र काम करत होते. आपापसातील वादातून हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे. माझ्यावर पूर्णपणे राजकीय आरोप आहेत. एखाद्या गाडी खाली एखादा श्वान आला तर ते गृहमंत्र्यांचा राजीनामा मागतील, अशी त्यांची अवस्था झालेली आहे. पण विरोधीपक्षाचे काम विरोधीपक्ष करतोय'', असे फडणवीस म्हणाले.

## घोसाळकर यांच्या हत्येमागे सत्ताधारी पक्षाचा प्रवक्ता-विजय वडेट्टीवार



नागपूर दि.९ (प्रतिनिधी)- शिवसेनेचे माजी नगरसेवक आणि नेते अभिषेक घोसाळकर यांच्यावरील हल्ला हा सुनियोजित आहे. गोळ्या घालून खून केल्यानंतर आरोपीने आत्महत्या केली. यामागे कोण आहे, हे समोर यायला हवे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राची स्थिती यूपी, बिहार करून ठेवली आहे, अशी टीका विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली. ते आज नागपूर येथे बोलत होते.

एका लोकप्रतिनिधीवर गोळीबार होतो यापेक्षा राज्याचे दुसरे काय दुर्दैव असू शकते ? शिवसेनेचे माजी नगरसेवक आणि नेते अभिषेक घोसाळकर यांच्यावर गोळीबार झाल्याची घटना धक्कादायक असून राज्यातील एक नागरिक म्हणून प्रचंड चीड आणणारी आहे. या हत्येमागे सत्ताधारी पक्षाचा प्रवक्ता असल्याचा अरोपही वडेट्टीवार यांनी केला.

एका मागून एक गोळीबाराच्या घटना राज्यात घडत आहेत मुख्यमंत्री आणि गृहमंत्री ठिकाणावर आहेत का? नुसती कारवाई करतो, चौकशी करतो हे तुमचे शब्द किती पोकळ आहेत, बघताय का? लोकप्रतिनिधी सुरक्षित नाही, नेत्यांवर गोळीबार होतोय, सत्ताधारी आमदार बंदुका घेऊन दहशत माजवत आहे. अश्या बातम्या पूर्वी फक्त बिहार आणि उत्तरप्रदेश मधून यायच्या. आज हे चित्र महाराष्ट्रातील जनता प्रत्यक्ष आपल्या राज्यात बघत आहे. राज्यात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री गुंडांना राजाश्रय देत आहेत, एकमेकांवर कुरघोडी करण्यात व्यस्त आहे. बाहेर काय सुरू आहे याची जाणीव तरी आहे का? गुंडांना राजाश्रय मिळत असेल तर कायद्याचा धाक त्यांच्यावर का राहणार? असे वडेट्टीवार म्हणाले.

## राज्यात गुंडांचे सरकार -रोहित पवार

पुणे दि.९ (प्रतिनिधी)- निर्भय बनो सभेला विरोध करणाऱ्या भाजप कार्यकर्त्यांनी पुण्यात राडा केला. यावर आमदार रोहीत पवार माध्यमांशी बोलतांना म्हणाले की, भाजपकडून आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. पण नागरिक म्हणून लोकशाही टिकली पाहिजे. मंत्रालयतही गुंडांना थेट परवानगी दिली जाते. मात्र शेतकऱ्यांना प्रवेश दिला जात नाही. महायुती सरकार हे गुंडांचे सरकार आहे. पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी गुंडांची झाडाझडती घेतली, त्याबद्दल त्यांचे कौतुक आहे. पण परेड घेतल्यानंतर दुसऱ्या दिवशी गुंडांनी रिल्स केले. या गुंडांना सरकार पोसत असल्याचा आरोपही यावेळी रोहित पवारांनी केला.

## यूपीएचे धोरण कधीही नेशन फर्स्ट नव्हते

### लोकसभेत श्वेतपत्रिकेवर चर्चा करतांना अर्थमंत्री सीतारामन यांचा हल्लाबोल

नवी दिल्ली दि.९ (वृत्तसंस्था)- अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी शुक्रवारी यूपीए आणि एनडीएच्या १० वर्षांच्या कार्यावर श्वेतपत्रिकेवर भाषण केले. १० वर्षांच्या कामाची ही श्वेतपत्रिका मोठ्या जबाबदारीने तयार करण्यात आल्याचे अर्थमंत्र्यांनी सांगितले.

सीतारामन यांनी कॉमनवेल्थ गेम्स घोटाळा, कोळसा घोटाळा, एनपीए, कोळसा खाण वाटप या मुद्द्यांवरून यूपीए सरकारवर निशाणा साधला. सीतारामन म्हणाल्या की, यूपीएचे धोरण कधीही नेशन फर्स्ट नव्हते. कुटुंब प्रथम हे धोरण ठेवून त्यांनी अर्थव्यवस्था उद्ध्वस्त केली.

भाषणाच्या शेवटी सीतारामन म्हणाल्या की, आपल्या जबाबदार सरकारने येणाऱ्या पिढ्यांना अत्यंत वाईट परिस्थितीतून सोडवले आहे. आज इथपर्यंत पोहोचण्यासाठी १० वर्षे मेहनत घेतली. २०४७ मध्ये विकसित भारताची निर्मिती करणार आहोत.

यापूर्वी, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी गुरुवारी लोकसभेत भारतीय अर्थव्यवस्थेवर ५९ पानी श्वेतपत्रिका सादर केली होती. २०१४ मध्ये मोदी सरकारने सत्ता हाती घेतली तेव्हा अर्थव्यवस्था नाजूक अवस्थेत होती, असे त्यात नमूद करण्यात आले आहे. २०१४ मध्ये मोदी सरकार आले तेव्हा कठोर निर्णय घेतले, ज्यामुळे अर्थव्यवस्था रुळावर आली असे त्यांनी यावेळी म्हटले.

## 'निर्भय बनो' सभेला विरोध करणाऱ्या भाजपा कार्यकर्त्यांकडून निखिल वागळेंच्या गाडीवर हल्ला

पुणे दि.९ (प्रतिनिधी)- पुण्यामध्ये निर्भय बनो कार्यक्रमासाठी पोहोचलेल्या पत्रकार निखिल वागळे यांच्या गाडीवर पोलिस बंदोबस्तात जात असतानाही प्राणघातक हल्ला करण्यात आला. भाजपकडून कार्यक्रम उधळून लावण्याचा इशारा दिल्यानंतर निखिल वागळे यांना निर्भय बनो कार्यक्रमासाठी पोहोचण्यासाठी पोलिस बंदोबस्त देण्यात आला. मात्र, कार्यक्रम स्थळी पोहोचेपर्यंत पोलिस बंदोबस्त असतानाही गाडी फोडण्यात आली. इतकंच नव्हे, तर शाईफेक तसेच अंडीफेकही करण्यात आली. या कार्यक्रमात पत्रकार वागळे, ज्येष्ठ अभिनेते अमोल पालेकर, असीम सरोदे यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

निखिल वागळे गाडीतून जात असतांना भाजपच्या कार्यकर्त्यांनी 'निर्भय बनो' सभेला विरोध दर्शवत निखिल वागळे यांच्या गाडीच्या काचा फोडल्या आहेत. यावेळी भाजप कार्यकर्त्यांकडून जोरदार घोषणाबाजीही करण्यात आली. तसेच वागळेंच्या गाडीवर शाई फेकण्यात आली.

भाजपकडून होत असलेल्या कडाडून विरोधानंतरही निखिल वागळे कार्यक्रमस्थळी पोहोचले. यावेळी निर्भय बनो कार्यक्रमाासाठी आलेल्या नागरिकांनी वागळे यांच्यावरील हल्ल्याचा निषेध केला. यामध्ये काही तरुणी सुद्धा जखमी झाल्या आहेत. भाजप कार्यकर्त्यांकडून करण्यात आलेल्या हल्ल्यात वागळे यांच्या अंगावरही शाई पडली. पोलिस बंदोबस्तात प्रवास होत असतानाही गाडी चारी बाजूने फोडण्यात आली आहे. भाजपकडून विरोध केल्यानंतर महाविकास आघाडीकडून वागळे यांचा कार्यक्रम होणारच, असा पवित्रा घेतला गेला. वीटा सुद्धा फेकून मारण्यात आल्या, असा आरोप महिला कार्यकर्त्यांनी केला. कपडे फाडण्याचा सुद्धा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप काही महिलांनी केला.

पुण्यातल्या खंडोजी बाबा चौकात निखिल वागळे यांच्या गाडीवर हल्ला करण्यात आला. या घटनेनंतर आता महाविकास आघाडीचे (पान ४ वर)

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री राज्यात गुंडांना राजाश्रय देतात-सुप्रिया सुळे

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- मुंबईतील उबाठा गटाचे माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांच्यावर गोळीबार करण्यात आली. या गोळीबारानंतर मॉरिस याने स्वतःवरही गोळीबार करून आत्महत्या केली. या गोळीबारानंतर विरोधकांनी राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केला आहे. तसेच आता राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही सरकारवर निशाणा साधला आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, घोसाळकर यांच्यावर गोळीबार केल्याची ही दुसरी वेळ आहे. एकीकडे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री हे गुंडांना भेटत आहेत. तर दुसरीकडे गोळीबाराच्या घटना घडत आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री हेच गुंडांना राजाश्रय देत असल्याचे समोर येत असल्याचे सुप्रिया सुळे यांनी ट्वीट केले आहे. नेत्यांचे दिवसाढवळ्या खून होत असूनही राज्याच्या गृहमंत्र्यांचे या घटनांकडे दुर्लक्ष असल्याचेही सुळे म्हणाल्या. तसेच, त्यांच्या या दुर्लक्षितपणामुळे राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राज्यातील कायदा सुव्यवस्था ही पूर्णतः ढासळलेली आहे. गृहमंत्र्यांच्या या नाकर्तेपणाची किंमत सर्वसामान्य जनतेने का चुकवावी? असेही सुळे म्हणाल्या.

## स्व.बाळासाहेब ठाकरेंनाही भारतरत्न द्या-राज ठाकरे

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- मोदी सरकारने गेल्या काही दिवसांमध्ये जाहीर केलेल्या भारतरत्न पुरस्कारांच्या घोषणेच्या पार्श्वभूमीवर मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी एक महत्त्वाची मागणी केली आहे. केंद्र सरकारने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना भारतरत्न पुस्कार घोषित करावा, असे राज ठाकरे म्हटले आहे. राज ठाकरे यांनी ट्विट करत आपली भूमिका सविस्तरपणे मांडली आहे. यामध्ये राज ठाकरे यांनी म्हटले आहे की, 'माजी पंतप्रधान स्व. पी.व्ही. नरसिंहराव, स्व. चौधरी चरण सिंग आणि भारतीय हरित क्रांतीचे जनक एस.स्वामिनाथन ह्यांना भारतरत्न सन्मान घोषित करण्यात आला. ह्या यादीतले एस.स्वामिनाथन ह्यांचं अवघ्या काही महिन्यांपूर्वी निधन झालं. इतकी अफाट कामगिरी करणाऱ्या शास्त्रज्ञाला त्यांच्या हयातीत हा बहुमान मिळायला हवा होता. असो. बाकी पी.व्ही नरसिंहराव आणि चौधरी चरण सिंग ह्यांना आणि काही वर्षांपूर्वी प्रणब मुखर्जींना भारतरत्न सन्मान घोषित करून, केंद्रातील भारतीय जनता पक्ष प्रणित सरकारने राजकीय औदार्य दाखवलंच आहे तर मग हेच औदार्य त्यांनी हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे ह्यांना देखील भारतरत्न घोषित करून दाखवायलाच हवं. देशातील प्रख्यात व्यंगचित्रकार आणि देशभरातील तमाम हिंदूंची अस्मिता जागृत करणाऱ्या अद्वितीय नेत्याला हा सन्मान मिळायलाच हवा. स्व. बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा ज्यांच्याकडे आलाय अशा माझ्यासारख्या अनेकांसाठी तो अत्यानंदाचा क्षण असेल.', असे राज ठाकरे यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे. त्यामुळे आता मोदी सरकार राज ठाकरे यांची ही मागणी मान्य करणार का, हे पाहावे लागेल.

## भुजबळांचा पडद्यामागून मराठा आरक्षणाला विरोध, पैसे देऊन याचिका दाखल करायला लावल्या-मनोज जरांगे

बीड दि.९ (प्रतिनिधी)- मराठा समाजाला यापूर्वी देखील आरक्षण मिळालं. मात्र, छगन भुजबळ यांनी पडद्यामागून पैसे देऊन आरक्षणाला विरोध करण्यासाठी कोर्टामध्ये याचिका दाखल करायला लावल्या. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी ज्या ज्या समित्यांनी आतापर्यंत काम केलं. त्या समितींचा अहवाल खोटा ठरवण्यासाठी छगन भुजबळ यांनी सातत्याने प्रयत्न केला, असं म्हणत 'येवल्याचे येडपट' असा उल्लेख देखील यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. गेवराई तालुक्यातील गंगावाडी येथे झालेल्या सभेत ते बोलत होते.

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषण करण्याचे ठरवलं होतं. मात्र, उपोषण करण्यापूर्वीच सरकारने त्यांच्या मागण्या मान्य केल्या. मात्र, यावर अनेकांनी टीका केली आणि मनोज जरंगे पाटील यांना मुंबईत जाऊन काय मिळालं? असा प्रश्न उपस्थित केला होता यावर बोलताना मनोज जरंगे पाटील म्हणाले की, मराठा समाजाच्या नावावर जे लोक पैसे खातात. त्यांना असं वाटतं की, मुंबईत जाऊन समाजाला काय मिळालं. पण ७५ वर्षांमध्ये मराठा समाजाला जे मिळालं नाही ते मुंबईत जाऊन आपण मिळवलं, असं प्रत्युत्तर म्हणून जरांगे पाटील यांनी टीका करणाऱ्यांना दिले आहे. आरक्षणासंदर्भात सरकारने अधिसूचना जारी केली असून लवकरच कायदा करण्यासाठी आपण सरकारला भाग पाडू, असे जरांगे पाटील म्हणाले आहेत.

## इंजिनिअरिंग, मेडिकलसह ६०० अभ्यासक्रमामध्ये मुलींना मोफत शिक्षण-चंद्रकांत पाटील

जळगाव दि.९ (प्रतिनिधी)- ज्या कुटुंबाचं उत्पन्न आठ लाखांहून कमी आहे अशा मुलींना येत्या जूनपासून मोफत शिक्षण देणार असल्याची मोठी घोषणा राज्याचे उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली. जळगावात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी ही घोषणा केली.

उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात विविध नवीन इमारतींच्या उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मुलींना मेडिकल, इंजिनिअरिंग अशा वेगवेगळ्या तब्बल ६०० पेक्षा जास्त अभ्यासक्रमांना मोफत शिक्षण देण्याची घोषणा केली.

कार्यक्रमानंतर मंत्री चंद्रकांत पाटील व्यासपीठावरून बाहेर पडत असताना विद्यार्थी तरुणांनी त्यांना अडवत केवळ मुलींना सवलत देण्याच्या बाबत नाराजी व्यक्त केली. राज्यातील मुलींप्रमाणेच आम्हालासुद्धा मोफत शिक्षण द्या अशी मागणी विद्यार्थ्यांनी मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे केली. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे याबाबत संवेदनशिल असून त्यांच्यापर्यंत हा निरोप पोहोचवतो असं चंद्रकांत पाटील म्हणाले. मात्र मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आमचं ऐकूनच घेतलं नाही असा आरोप यावेळी विद्यार्थ्यांनी केला.

## मॉरिस सुडाने पेटला होता; मॉरिसच्या बायकोचा पोलिसांना जबाब

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- अभिषेक घोसाळकर यांच्या हत्येने मोठी खळबळ उडाली आहे. मॉरिस नरोनाने फेसबुक लाइव्हवेळी गोळ्या झाडून हत्या केली.त्याच्या पत्नीने पोलिसांना जबाब दिला आहे. पत्नी आणि मुलीला मॉरिसने परदेशी पाठवल्याचे म्हटले जात होते. पण मॉरिसची पत्नी घोडबंदर इथे होती अशी माहिती समोर आली आहे. त्यांनी एका वृत्तवाहिनीला घोसाळकर हत्याकांड प्रकरणी प्रतिक्रिया दिली आहे.

मॉरिस अनेकदा मी अभिषेकला सोडणार नाही, मी त्याला संपवणारच असे म्हणायचा. पण मॉरिसच्या बोलण्याकडे मी लक्ष दिले नाही. मॉरिसला बलात्कार प्रकरणी अटक झाली होती. तो जवळपास ५ महिने तुरुंगात होता. तुरुंगातून तो जामिनावर सुटला होता. आपल्या अटकेमागे अभिषेक घोसाळकर यांचा हात आहे अशी त्याची समजूत होती. त्याचाच राग मॉरिसच्या मनात धगधगत होता.

## धाकट्या भावाने पार्थिवाला अग्नी दिला, अभिषेक घोसाळकर अनंतात विलीन

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- ठाकरे गटाचे माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. त्यांच्या पार्थीवाला धाकट्या भावाने अग्नी दिला. यावेळी हजारो कार्यकर्त्यांच्या डोळ्यात अश्रू आल्याचं दिसून आलं. अभिषेक घोसाळकर यांची मॉरिन नोरोन्हा या व्यक्तीने गुरूवारी संध्याकाळी गोळ्या घालून हत्या केली होती.

उद्धव ठाकरे, त्यांच्या पत्नी रश्मी ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी आज विनोद घोसाळकर यांच्या घरी भेट दिली आणि त्यांचं सात्वन केलं.

अभिषेक घोसाळकर आणि नोरोन्हा गुरूवारी संध्याकाळी एकत्र फेसबुक लाईव्ह करत होते. लाईव्ह संपत आलं तेव्हा मॉरिस खोलीतून बाहेर गेला, त्यानं पिस्तुल काढलं आणि पुन्हा खोलीत शिरुन घोसाळकरांवर गोळीबार केला. अतिरक्तस्त्राव झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान, या गोळीबार प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे.

अभिषेक घोसाळकरांची हत्या ज्या पिस्तुलानं झाली, ते पिस्तुल मॉरिस नोरोन्हाचा अंगरक्षक अमरेंद्र मिश्राचं होतं. मिश्राला आज सकाळी पोलिसांनी ताब्यात घेतलं. तब्बल दहा ते बारा तास चौकशी केल्यावर मिश्राला क्राईम ब्रँचनं अटक केली आहे. त्याला शनिवारी सकाळी बोरिवली कोर्टात हजर करण्यात येणार आहे.

# ‘मेसेज फॉरवर्ड’ करण्यापेक्षा विचाराने फॉरवर्ड होऊया!

साधारण २५ ते ३० वर्षांपूर्वी केलेले लेखन प्रसिद्ध करण्यास मर्यादा होत्या. पुस्तके काढणे अनेकांना अशक्य असे आणि पुस्तक प्रत्येकाचेच निघत नसे. पुस्तक लेखनामध्ये आणि ते प्रसिद्ध करण्यामध्ये दर्जासुद्धा कायम राखला जात असे. हीच गोष्ट वृत्तपत्र लेखनामध्येसुद्धा असे. बातमी लेखनापासून ते लेख लेखनापर्यंत प्रत्येक गोष्टीमध्ये दर्जा सांभाळला जात असे. त्याचे संपादन केले जात असे. त्यामुळे वाचकांसाठी मोजकेच आणि योग्य मर्यादित स्वरूपाचे लेखन समोर येत असे.

मात्र ही स्थिती गेल्या २५ वर्षांत खूपच बदलली आहे. कारण आता सोशल मीडिया अधिक सक्रिय झाला आहे. त्यामुळे कोणीही लेखक होऊ लागलाय, कोणीही बातमीदार होऊ लागलाय आणि या सगळ्याचा परिणाम साहित्य आणि वृत्तपत्र क्षेत्रांमध्ये अधिक होताना दिसून येतोय. कुणाचीही कविता आपल्या नावाने खपवून, कुठल्याही कवितेची तोडमोड करणं, कुणाचेही लेख, साहित्य आपल्या नावावर वापरणं, कुठल्याही प्रकारची मतं व्यक्त करणे, अभ्यास न करता बोलणं अशा अनेक गोष्टी आता सोशल मीडियाच्या माध्यमातून दिसू लागल्या आहेत. प्रत्येकालाच व्यक्त व्हायचं असतं. पण प्रत्येक गोष्टीला काही मर्यादा आणि चौकटी समाजानेच घालून दिलेल्या आहेत. म्हणूनच समाजात कवी, लेखक, पत्रकार, विचारवंत यांना आतापर्यंत एक मानाचं स्थान होतं. त्यांनी मांडलेले विचार हे समाजमान्य विचार आहेत, असंच म्हटलं जायचं.

मात्र ही व्याख्या हळूहळू पुसट होतेय की काय अशी स्थिती निर्माण झाली आहे. त्यात हाती आलेले सोशल मीडियाचं हे शस्त्र दुधारी आहे. यातून अनेक चांगल्या गोष्टी होतात. मात्र त्याच वेळेला सर्वाधिक वाईट गोष्टी झालेल्यासुद्धा या सोशल मीडियामुळे पाहायला मिळत आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये सोशल मीडियावर आलेले व्हीडिओ, मेसेजेस, त्यातून ठेवण्यात आलेले स्टेटस या सगळ्याच प्रकारातून समाज ढवळून निघाला. यापूर्वी आपल्या मनात येणारे योग्य, अयोग्य विचार यांना वळण लावण्यासाठी आपल्यासमोर विचारवंतांनी, लेखकाने मांडलेले मार्गदर्शक विचार पुस्तकातून, लेखातून उपलब्ध असायचे. त्यातूनच घरातले ज्येष्ठ मंडळी, आपले शिक्षक, प्रोफेसर यांच्याकडून मार्गदर्शन घेऊन आपण योग्य दिशेने विचार करतो आहोत की नाही, आपली मत योग्य दिशेने आपण व्यक्त करत आहोत की नाही याबाबत तरुण पिढीला समज मिळत असे. मात्र सोशल मीडियामध्ये हा मार्गच आता उपलब्ध नाही असं वाटतं.

‘फॉरवर्डिंग’ ही एक अत्यंत गंभीर प्रक्रिया सोशल मीडियाच्या या जगामध्ये पाहायला मिळते. आपल्या मोबाइलवर असलेल्या कुठल्याही सोशल मीडिया ॲपवर आलेला कुठलाही मेसेज, कुठलाही व्हीडिओ विचार न करता फॉरवर्ड केला जात आहे. वास्तविक आपण जे वाचतो, आपण जे पाहतो किंवा आपण जे ऐकतो आहोत ते दुसऱ्याला पाठवण्याआधी योग्य आहे की अयोग्य आहे याचा विचार प्रत्येकाने करणे गरजेचे आहे; परंतु हा सोशल मीडिया अगदी बालवाडीत जाणाऱ्या मुलापासून वयोवृद्धांपर्यंत, अशिक्षितांपासून सुशिक्षितांपर्यंत, प्रौढांपासून आक्रमक विचारांच्या तरुणांपर्यंत सगळ्यांच्याच हातात आहे. त्यातही वयोगट, स्त्री-पुरुष अशा कोणत्याही गटांसाठी चाळण करून हे मेसेज फॉरवर्ड केले जात नाहीत.

अनेक मेसेज ॲपमध्ये वेगवेगळ्या विचारांची, वेगवेगळ्या मतांची, वेगवेगळ्या जातींचे धर्मांची माणसं ‘ग्रुप’ या नावाने एकत्र आलेली असतात. तेथे असे ‘फॉरवर्डेड मेसेज’ खूपच गोंधळ घालतात. अनेकदा त्या ग्रुपवर एखादा अल्पवयीन मुलगा किंवा मुलगी, तरुण-तरुणी, स्त्री-पुरुष, वृद्ध मंडळी अशा प्रत्येक वयोगटातील ‘मेंबर’ असतो. त्याच्या हातातील मोबाइलवर ग्रुपमध्ये आलेला मेसेज प्रत्येकजण वाचतो आणि आपापल्या पद्धतीने त्याचा अर्थ काढून व्यक्त होत राहतो. अनेक मेसेज ॲपमध्ये त्यातही लोकप्रिय मेसेज ॲपमध्ये अशा ग्रुपमधून वादविवाद, भांडणं, अगदी गुन्हेगारीपर्यंतच्या अनेक गोष्टी पाहायला मिळत आहेत.

गेल्या १० ते १५ वर्षांत सोशल मीडिया अधिक सक्रिय झाला आहे. इतका की नावाजलेले लेखक, कवींपासून वृत्तपत्र, टीव्ही चॅनल्स, टीव्ही न्यूज चॅनल्स यांनीसुद्धा सोशल मीडियाला आपल्यासोबत घेतलं आहे. मात्र जसं वृत्तपत्र, एखादं पुस्तक, एखादं मासिक, वृत्तवाहिन्या यांच्यावर प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख याच्या सत्यतेची जबाबदारी त्यांचे त्यांचे संपादक, लेखक घेत असतात, अशी कोणतीही जबाबदारी या ‘फॉरवर्डेड मेसेज’मध्ये कोणाचीच नसल्यामुळे या मेसेजेसची सत्यता कोणीच पडताळून पाहत नाही.

वास्तविक आपल्या मोबाइलवर येणारे प्रत्येक मेसेज खरे असतीलच असं नाही. त्याची सत्यता पडताळून घेण्याची जबाबदारी ज्याचा मोबाइल आणि ज्याने तो मेसेज वाचला त्याची आहे; परंतु आजकाल अशा जबाबदारीने वाचणाऱ्यांची संख्या प्रचंड प्रमाणात दुर्मीळ झाली आहे. त्यामुळेच चुकीचे मेसेज फॉरवर्ड होऊन समाजमन दूषित होऊ लागलं आहे. अशा दूषित, गोंधळलेल्या समाज मनामुळे समाजातील एकी, मैत्री, नातेसंबंध या सगळ्यावरच मोठ्या प्रमाणावर परिणामसुद्धा होताना दिसत आहेत. यापूर्वी या समाजात अनेक जाती धर्माचे लोक आनंदाने राहत असत; परंतु सोशल मीडियाचा वापर अनेक विघातक संघटना, माणसं समाजात दुही पसरवण्यासाठी करताना दिसत आहेत. त्यासाठी फॉर्वर्डेड मेसेज फार महत्त्वाची भूमिका बजावताना दिसतं आहे. अशा वेळी चुकीच्या गोष्टी पसरू नये यासाठी नेहमीप्रमाणे कुठल्याही सरकारला जबाबदार धरण्यापेक्षा आपण जे करतो आहोत, आपण जे बोलतो आहोत, आपण जे व्यक्त होत आहोत ते योग्य आहे का? हे तपासून बघण्याची जबाबदारी खरं तर प्रत्येकाचीच आहे.

अनेक वर्षांपूर्वी साक्षरता आणि सुशिक्षितपणा या गोष्टी खूपच दुरापास्त होत्या. समाजातील ठरावीक वर्गच उच्चशिक्षित होता. तरीही तेव्हा समाजात शांतता होती. मात्र आता प्रत्येकालाच शिक्षण दिलं जातं. त्यातून सगळेच सुशिक्षित होतील, असं नाही. मात्र प्रत्येक जण आता साक्षर झाला आहे. अशा वेळेला किमान समाजातल्या खूप मोठ्या वर्गाकडून अशा फॉर्वर्डेड मेसेजेसबद्दल जबाबदारीने वागणं, व्यक्त होणं, त्यातही तरुण वर्गाकडून या फॉरवर्डेड मेसेजवर व्यक्त होणं, मत मांडणे, जबाबदारीने वागणं ही अपेक्षा आहे, तर तरुण मनाला भरकटू न देण्याची जबाबदारी त्याच्या शिक्षक आणि पालकांवर निश्चितच आहे. गेल्या काही दिवसांपासून समाजात होणाऱ्या अनेक विचलित करणाऱ्या घटनांचे परिणाम हे अशाच फॉरवर्डेड मेसेजमुळे होताना दिसत आहेत. त्यामुळेच आता शिक्षण पद्धतीतसुद्धा प्रत्येक वयोगटामध्ये सोशल मीडियावर आधारित एक तरी धडा असावा आणि त्या दृष्टीने जनजागृती करावी, अशीही अपेक्षा आहे आणि त्यातून आपणही विचाराने फॉरवर्ड व्हायला हवे हेही तितकेच खरे!

# स्वतंत्र मजदूर युनियन ही एक राष्ट्रीय ट्रेंड युनियन आहे

**आज** देशात प्रत्येक विचारांच्या संस्था, संघटना आणि पक्ष आहेत. त्या केवळ निष्ठावंत शिष्य, सैनिक आणि अनुयायीयांच्या प्रामाणिकपणे, नियोजनबद्ध आणि शिस्तबद्ध काम केल्यामुळे स्वाभिमानाने उभ्या आहेत. त्यांच्या लक्षवेधी योजना, त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत आहे. म्हणूनच ते त्या समाजाच्या लक्षवेधी वास्तू निर्माण करून आजच्या युवा पिढीला प्रेरणा देत आहेत. त्यातील स्वतंत्र मजदूर युनियन ही एक राष्ट्रीय ट्रेंड युनियन आहे. तिने नागपुरात तीन मजली भव्य प्रशिक्षण केंद्र उभे केले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नांवाचा जयजयकार करणारा मागासवर्गीय समाज अन्याय अत्याचार व अभिवादन करण्यासाठी भावनिक दृष्ट्या एकत्र येऊन देशातील इतर समाजाचे लक्षवेधण्याचे ऐतिहासिक काम करतो.पण तो निष्ठावंत शिष्य, सैनिक आणि अनुयायी नाही, तो मोठ्या प्रमाणात फक्त भक्त झाला आहे. तर आरक्षणाचा लाभधारक सुशिक्षित सुरक्षित नोकरी करणारा निष्ठावंत शिष्य,सैनिक आणि अनुयायी म्हणून कोणत्याही चौकटीत बसत नाही.

मागासवर्गीय समाज अज्ञानी, असुशिक्षित असंघटित असह्य होता तेव्हा त्यांचे प्रबोधन करून संघटना बांधण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.तेव्हा त्यांच्या सोबत निश्चयाने,निष्ठेने आणि निमूटपणे कार्य करणारे प्रामाणिक कार्यकर्ते होते.घाण काम करणे सोडा,लाचारी जीवन सोडा कष्टाचे काम करून स्वाभिमानाने जगणे स्वीकारा.त्यासाठी खेडे सोडा शहर गाठा हा संदेश बाबासाहेबांनी दिला होता, त्यांची अंमलबजावणी ज्या लोकांनी केली ते आज शहरात सुखा समाधानाने आणि स्वाभिमानाने जगत आहेत.ज्यांनी खेडे सोडले नाही. ते कायम दडपणा खाली किंवा तडजोड करून जगत असतात.गावातील असंतोष हा एक तर निवडणुकीत किंवा भिम जयंतीत हमखास बाहेर पडतो. गावातील शाळेत मुलामुलीनी भिम गीतावर डान्स नृत्य करू नये ही मानसिकता शाळेच्या काही गुरुजनात ठासून भरलेली असते. त्याला सुरक्षित नोकरी करणारा सुशिक्षित शिक्षक विरोध करण्याची हिंमत दाखवत नाही. ते काम असंघटित कमी शिकलेला शेतमजूर कार्यकर्ता करतो. त्याला कोणतीच भीती वाटत नाही. त्यांच्या मागे खेड्या पड्यातील असंघटित समाज बांधव माहिती पडताच उभा राहतो. आणि आंदोलन होते. मग सुशिक्षित सुरक्षित नोकरी करणाऱ्या नोकरदार सोबत असे का होत नाही?. कारण तो बाबासाहेबांनी सांगितलेल्या शिका संघटित व्हा संघर्ष करा या संदेशाकडे स्वार्थसाठी दुर्लक्ष करतो.त्यामुळेच संघटित होत नाही. अन्याय अत्याचार झाला की त्याला समाज व समाजाच्या संघटना आठवतात. सुशिक्षित सुरक्षित नोकरी करणाऱ्यानी संख्येने कमी असले तरी बाबासाहेबांच्या क्रांतिकारी विचारांच्या कामगार संघटनेचे सभासद होऊन सोबत राहिले पाहिजे. तरच स्वताची ओळख निर्माण करता येईल.अन्यता अनेक मार्गाने तुम्हा त्रास दिल्या जाईल हे लक्षात ठेवले पाहिजे.स्वतंत्र अस्तित्व ठेवण्यासाठी त्याग,कष्ट आणि जिद्द ठेवली तर वेगळी ओळख निर्माण करता येते. मागासवर्गीय कामगार कर्मचारी अधिकारी यांनी कायम लक्षात ठेवावे.‘मागीतल्याने मिळत नाही,संघर्षा शिवाय पर्याय नाही.’

स्वतंत्र मजदूर युनियनची मातृसंस्था ही महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन,हे एक असे कामगार संघटन आहे,जे मागील ३८ वर्षापासून आदरणीय त्याग मूर्ती जे. एस. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सतत महाराष्ट्रात नव्हे तर देशातील २२ राज्यात आणि ४८ विभागात कार्यरत आहे.रमेश रंगारी,जे.एस पाटील इंजिनियर असणाऱ्या मान्यवरांनी एका एका कामगारांचे प्रबोधन करून संघटित केले. बोटावर मोजता येतील एवढ्या संख्येने एक विद्युत क्षेत्रात केलेली सुरुवात आज विविध क्षेत्रातील कामगारांची संख्या तीन साडेतीन लाखात झाली आहे.केंद्र सरकारची मान्यता असण्यासाठी चार उधोग,चार राज्य आणि पाच लाख कामगारांची संख्या पाहिजे. त्यासाठी मागासवर्गीय कामगार कर्मचारी अधिकारी यांनी महात्मा ज्योतिबा फुले,रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे,राजर्षी शाहू महाराज, पेरियार रामस्वामी नायकर,आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी विचाराधारेवर चालणाऱ्या राष्ट्रीय ट्रेड युनियन मध्ये सहभागी झाले पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १२/१३ फेब्रुवारी १९३८ ला मनमाड येथे रेल्वे च्या गंग मन कामगारांच्या दोन दिवशीय परिषदेत मध्ये सांगितले होते. कामगारांचे दोन दुश्मन आहेत. एक भांडवलशाही दुसरी ब्राम्हणशाही या विरोधात लढण्यासाठी देशातील मागासवर्गीय कामगारांनी एकत्र येऊन स्वताची संघटना युनियन बनविली पाहिजे.ती राष्ट्रीय ट्रेड युनियन शी संलग्न असली पाहिजे. तिचे नेतृत्व कामगारांनीच केले पाहिजे. त्यासाठी कामगार कार्यकर्ता प्रशिक्षण घेऊन तयार झाला पाहिजे. हा वारसा स्वतंत्र मजदूर युनियन २००३ स्थापना करून स्वीकारला त्याचे राष्ट्रीय अधिवेशन दरवर्षी होत असते.यावेळी स्वतंत्र मजदूर युनियनचे राष्ट्रीय अधिवेशन १७/१८ फेब्रूरवारी २०२४ ला सुरेश भट सभागृह रेशीमबाग नागपूर येथे आयोजित करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन प्रा. कांचा इलल्या प्रसिद्ध विचारवंत यांच्या हस्ते होणार आहे. डॉ. नितीन राऊत माजी मंत्री,एड.असीम सरोदे प्रसिद्ध विधितज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.आणि ४८ विभागाचे प्रमुख कामगार नेते उपस्थित राहणार आहेत.

त्यागमूर्ती आदरणीय जे. एस.पाटील राष्ट्रीय अध्यक्ष स्वतंत्र मजदूर युनियन यांच्या अध्यक्षीय मार्गदर्शनाखाली दोन दिवशीय अधिवेशन चालणार आहे. तरी कामगार,कर्मचारी अधिकारी यांना जाहीर आवाहन आहे की त्यांनी या अधिवेशनत सहभागी होऊन भविष्यातील संकटावर कशी मात करावी याचे दिशादर्शक मार्गदर्शन घ्यावे. ज्यांना येणे शक्य नाही त्यांनी असंघटित कामगारांना सहभागी करून घेण्यासाठी त्यांची व्यवस्था करण्यासाठी आर्थिक मदत करावी.सुरक्षित नोकरी करणारा सुट्टी टाकून स्वता आंदोलनात सहभागी होत नाही.बायको मुलांना पाठवत नाही.पण असंघटित कामगार कशाची पर्वा न करता स्वता सहभागी होतोच आणि बायको मुलांना नातलगांना सोबत घेऊन आंदोलन यशस्वी करून दाखवतो म्हणूनच सत्ताधाऱ्यावर दबाव येतो.तोच खऱ्या अर्थाने शासन करणाऱ्या यंत्रणेवर नियंत्रण ठेवतो.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४१ साली सांगितले होते ते आपण विसरतो.व स्वतःलाच वंचित करून घेतो.हे आता थांबविले पाहिजे त्याशिवाय तुम्ही कोणत्याही मोठे संघटन यशस्वी करू शकत नाही.त्यासाठी १७ आणि १८ फेब्रुवारी २०२४ ला राष्ट्रीय अधिवेशन नागपूर येथे होत आहे. देशभरातून विविध क्षेत्रातील संघटित असंघटित कामगार प्रतिनिधि येणार आहेत. त्यासाठी संघटित कामगार कर्मचारी अधिकारी यांनी राष्ट्रीय अधिवेशन यशस्वी करण्याकरिता सढळ हस्ते बँक खात्यात आर्थिक मदत करावी. स्वतंत्र मजदूर युनियन Independent Labour Union A/C No.60093090158 Bank Of Maharashtra, Branch Sitabuldi Nagpur,Branch Code 00005 IFSCode: MAHB0000005, किंवा 9920403859 या नंबर वर उर्ज्ञ जी पे करावा. त्याचा स्क्रीन शॉट पाठवून माहिती द्यावी.असे आवाहन सागर तायडे अध्यक्ष स्वतंत्र मजदूर युनियन महाराष्ट्र राज्य. यांनी केले आहे.

**– सागर रामभाऊ तायडे, भांडुप मुंबई ९९२०४०३८५९, अध्यक्ष स्वतंत्र मजदूर युनियन महाराष्ट्र राज्य.**

# संस्कार

**काल** मुंबईवरून रात्री घरी येताना फास्ट लोक मिळाली.पत्नी सोबत होती.स्त्री दक्षिन्य म्हणून एक कॉलेजवयीन मुलाने तिला बसायला जागा दिली आणि तो दरवाजात उभा राहायला गेला.लोकलमध्ये गर्दी होती,पण नेहमीसारखी नव्हती, रविवार असल्यामुळे चाकरमानी घरी किंवा तीन दिवस लागोपाठ सुट्टी आल्याने पिकनिकला गेले होते.

पत्नीला बसायला जागा मिळाली याचे समाधान झाले.पुरुषांच्या डब्यात स्त्रियांना हाच फायदा होतो.कोणी तरी एखादा प्रवासी दयाळू असतोच असतो.तो स्त्रीला बसायला जागा देतो.महिलांच्या डब्यात मात्र असे घडत नाही.महिला अधिक जागा अडवून बसतात.उभ्या असलेल्या नवीन स्त्रीला बसायला जागा देण्याऐवजी पुढच्या स्टेशनवर लोकलमध्ये आलेल्या रोजच्या प्रवासी महिलेला बसायला जागा देतात.असे मी महिलांकडूनच ऐकले आहे.

प्रवासातले आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे नवरा बायको प्रवास करत असतील तर स्त्रीला बसायला जागा मिळते एखादा पुरुष प्रवासी उदार होऊन उभा राहतो.आणि महिलेला जागा मिळते.पण जर त्याच महिलेच्या शेजारची जागा रिकामी झाली तर बहुतेकवेळा ती स्त्री ज्या पुरुषाने तिला बसायला जागा दिली होती त्याला जागा न देता उभ्या असलेल्या आपल्या पतिला बसायला बोलवते.तर माझी पत्नी बसली होती.मी समोरच उभा होतो.समोरच्या तीन जागा असलेल्या बाकड्यावर किरकोळ शरीरयष्टीचे लोक तीन प्रवासी बसले होते. ते थोडे सरकले तर चौथी जागा निर्माण होऊ शकते.पण थकलेल्या प्रवाशांना इतरांचे काही घेणे देणे नसते,स्वतःला बसायला जागा मिळाली मग बस,बाकी दुनिया जाये भाड मे.असेच ते वागत असतात. मी ज्यांच्या बाजूच्या बाकड्याजवळ उभा होतो,त्याच्या समोरच्याच सात सीटच्या बाकड्यावर पत्नी बसली होती.ती मला म्हणाली,’इथे बसा ना,हे सरकतील थोडे.’ आणि पडत्या फळाची आज्ञा मानून एक प्रवासी सरकला तसे दोघेही सरकले.थोडीशी जागा तयार झाली.म्हणजे अर्धे बसता येईल इतकी.मी बाकड्यावर सरळ न बसता आडवा बसलो.मला बसून पाचच मिनिटे झाले असतील नसतील.इतक्यात पुढचे स्टेशन आले.स्टेशनवर नेहमीप्रमाणे काही प्रवासी उतरले काही डब्यात आले.त्यापैकी सात आठ प्रवासी आम्ही बसलो होतो त्या बाजूला आले.त्यापैकी एकजण चौथी शीट करून बसला.बाकीच्यांना उंभे राहावे लागले. माझ्या शेजारी उभे असलेल्यांपैकी एक प्रवासी खूप जोरजोरात श्वास घेत होता.बिचारा धावत आला असावा माझ्यासह बाकीचे प्रवासी त्याच्याकडे बघत होते.त्याचा श्वास जोरात सुरू होता.मी जागेवरून उठलो आणि त्या प्रवाशाला बसायला सांगितले.तो नाही म्हणाला,पण मी जबरदस्ती करून त्याच्या खांद्याला धरून त्याला बसायला सांगितले. तो कसाबसा बसला.अजूनही त्याचे श्वास सुरूच होते.त्यातच त्याच्या सोबत आलेल्या त्याच्या एक सहकाऱ्याने त्याला प्यायला पाणी दिले.पण मी त्याला पाणी पिऊ दिले नाही.एकतर त्याचा श्वास अजूनही जोरातच सुरू होता.म्हणजे तो धापा टाकत होता.हृदय जोरात काम करत होते. त्यात पाणी पिला असता तर त्याच्यावर काही परिणाम झाला असता असे मला वाटले, तोही पाणी प्यायला नाही.धापा टाकत बसला.तो अजून दोन मिनिटे लोकल मिळवण्यासाठी धावला असता तर कदाचित त्याच्या हृदयाने रजा घेतली असती. काही वेळाने तो शांत झाला.मी विचारले,’ इतक्या धावत लोकल मिळवण्याची गरज होती का? दुसरी मिळाली असती.’ ’नाही,ही शेवटची फास्ट लोकल आहे.यानंतर स्लो लोकल आहेत.’

’मग काय फरक पडतो,पंधरा वीस मिनिटांचा फरक पडत असेल ना?’

’नाही,२०-२५ मिनिटांचा फरक पडतो.’

’मग काय झाले,थोडा उशीर होईल,घरीच चालला आहात ना,कामावर तर नाही ना जात आहात, म्हणजे लेट मार्कची भीती नाही.इतकी घाई करू नका.’

’नाही, आजच झाली घाई.आज कामावर वेळ जास्त झाला आणि ही गाडी मिळावी म्हणून धावपळ झाली.’

’ठीक आहे,पण यापुढे लक्षात ठेवा.धावपळ करू नका.’

’नाही’ असे म्हणत त्याने त्याच्या साथीदाराकडून पाणी घेतले आणि घटघट प्यायला.मग उठून मला बसायला जागा द्यायला लागला.

मी म्हटले,’अहो बसा,अजून शांत झाला नाही आहात तुम्ही.’

नाही नाही म्हणत होता,पण मी जबरदस्तीने बसवले, मग बसला. पण आणखी एक स्टेशन गेल्यानंतर तो उठला आणि मला बसायला जागा दिली,तो उभा राहिला,मला ‘थँक्स’ म्हणाला.

‘थँक्स कशाला म्हणायला पाहिजे.’

मी म्हटले

’नाही हो,लोक बिलकुल इतरांचा विचार करत नाहीत,शेजारचा मेला तरी त्यांना काही घेणेदेणे नसते.तुम्ही उठून मला शीट दिलीत.खुप मोठ्या मनाचे आहात तुम्ही.’

’अहो,कसले मोठे मन.असं काही नाही.तुम्ही खूप जोरात श्वास घेत होतात. म्हणून मला वाटले तुम्हाला बसायला जागा दिली पाहिजे,बस इतकेच.’

‘ते ठीक आहे ,तुम्ही तर चौथ्या शिटवर बसला होतात. आरामात तीन शीटवर बसलेल्या लोकांना नाही वाटले उठावेसे पण तुम्ही उठलात,माणुसकी दाखवलीत, हॅट्स ऑफ यु.’

‘अहो, असे काही नाही. मी काही मोठे काम केले नाही.माझ्या जागी दुसरे असते तर तेच केले असते.’

‘करायला पाहिजे होते,पण नाही केले ना.हे फक्त माणुसकी असणारे लोकच करू शकतात,स्वार्थी जगात कोणी कोणाचा विचार करत नाही,कोणी बेशुद्ध पडले तरी त्याच्याकडे लक्ष देत नाहीत.इतकेच काय तर गाडीतून कोणी खाली पडले तरी उठून बघत नाहीत तिथे बसूनच विचारतात ’काय झाले? पडला का?’ उठले तर शीट जायची भीती असते.इतके स्वार्थी झाले आहेत लोक,पण तुमच्यासारखे चांगले लोकही आहेत या जगात म्हणून जग चालले आहे.’

माझें स्टेशन यायला आणखी अवकाश होता. मी विचारात पडलो,इतक्याशा गोष्टीचे सुद्धा कोणाला कौतुक वाटू शकते.त्याबद्दल कोणी कृतज्ञ राहू शकते.मला मागचे दिवस आठवले.एकदा कसारावरून नाशिकला बसने जात होतो, टू बाय टू शीटची बस होती. बस सुरू झाली सगळे बसले होते. फक्त मी एकटा उभा होतो,कोणालाही दया आली नाही,उलट ज्यांना शीट मिळाली होती ते पसरून बसले होते,कोणी मोबाईलमध्ये डोके घालून होते तर कोणी चक्क डुलक्या घेत होते.कोणी मुद्दाम माझ्याकडे बघण्यास टाळत होते. तरुण कॉलेजची मुले होती,ती आपसात गप्पा मारण्यात रंगली होती.पण कोणालाही वाटले नाही,की थोडावेळ मला बसायला द्यावे,किंवा थोडे सरकून मला बसायला थोडीशी जागा करावी.मी संपूर्ण प्रवास उभ्यानेच केला होता.हा प्रसंग उगीचच आठवला.त्याच्यासोबत आणखी एक प्रसंग आठवला,लोकलने प्रवास करण्यासाठी लोकलच्या डब्यात आलो.मला बघताच मी शिकवलेल्या एक विद्यार्थ्याने लगेच डोळे मिटले,डोळे मिटताना त्याला मी पाहिले पण मी काही बोललो नाही.मी उभाच राहिलो. प्रवास संपेपर्यंत मला बसायला जागा मिळाली नाही, मी जवळपास एक तास उभा होतो. जेंव्हा स्टेशन जवळ आले तेंव्हा त्या विद्यार्थ्याने डोळे उघडले.नजरानजर होताच म्हणाला,’सर?, बसा ना.’मी त्याला नम्रपणे नकार दिला.पाचेक मिनिटात स्टेशन येणार होते.फक्त मला एक रुखरुख लागून राहिली होती की,मी त्याच्यावर संस्कार करण्यात कुठेतरी कमी पडलो.

**– शांताराम ओंकार निकम**
९८२२७५८६७६,उल्हास नगर

# देशात वर्षाला १ कोटीहून अधिक कमाई करणाऱ्या टॅक्सपेयर्सच्या संख्येत वाढ

**नवी दिल्ली :** भारतात वर्षाला एक कोटी रूपयाहून अधिक कमाई करणाऱ्या टॅक्सपेयर्सच्या संख्येत चांगली वाढ पाहायला मिळाली आहे. ही संख्ये असेसमेंट वर्ष २०२३-२४मध्ये २.१६ लाखापर्यंत पोहोचली आहे. अर्थ राज्य मंत्री पंकज चौधरी यांनी संसदेत ही माहिती दिली. अर्थ राज्य मंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार २०१९ नंतर महत्त्वपूर्ण वाढीसह मोठी कमाई करणाऱ्यांमध्ये एक पॉझिटिव्ह ट्रेंड पाहायला मिळत आहे.

स्वतंत्र इन्कम टॅक्स कलेक्शनमध्ये साल दर साल २७.६ टक्के वाढ पाहायला मिळाली आणि अर्थ मंत्री निर्मला सीतारमण यांनी याचे श्रेय टॅक्स रिफॉर्म आणि देशाची आर्थिक विकासाच्या चांगल्या गतीला दिले आहे. तसेच प्रोफेशन इनकम रिपोर्टिंगमध्येही वाढ पाहायला मिळाल्याचे संसदेत सांगण्यात आले.




दरवर्षी १ कोटीहून अधिक पगार घेणाऱ्या टॅक्सपर्यंसची संख्या वाढली आहे. अर्थ राज्य मंत्री पंकज चौधरी यांनी संसदेत बजेट सत्रादरम्यान सांगितले, नव्या आकडेवारीनुसार ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत वर्ष २०२३-२४ साठी ही संख्या २.१६ लाखाहून अधिक झाली आहे.

अर्थ राज्य मंत्री पंकज चौधरी यांनी सांगितले की साल दर साल आधारवर देशात आयकर रिटर्न देणाऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ पाहायला मिळाली. यातील एक कोटीहून अधिक कमाई करणाऱ्या टॅक्स पेयर्सचा आकडा मोठ्या गतीने वाढत आहे. हा आकडा असेसमेंट वर्ष २०१९-२० मध्ये १.०९ लाख कोटी रूपये इतका होता. तर २०२२-२३मध्ये ही संख्या १.८७ लाखावर पोहोचली. २६ ऑक्टोबर २०२३ च्या आकडेवारीनुसार सध्याचे आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी ७.४१ कोटी टॅक्सपेयर्सने आयकर रिटर्न दाखल केला. यात ५३ लाख असे टॅक्सपेयर्स आहेत ज्यांनी पहिल्यांदा इन्कम टॅक्स दाखल केला.

# क्रांती चौकात भाजप विरुद्ध महाविकास आघाडी

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- राहुल गांधींनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल काढलेल्या अनुद्गाराचा निषेध करण्यासाठी आज, ९ फेब्रुवारीला सकाळी ११ ला भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते क्रांतीचौकात आले होते. त्याचवेळी ठाकरे गटाचे माजी नगरसेवक अभिषेक घोसळकर यांच्या हत्येचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीचे कार्यकर्ते आले. दोन्ही गट आमनेसामने आल्याने तणाव निर्माण झाला. दोन्हींकडून जोरदार घोषणाबाजी सुरू झाली. अखेर पोलिसांनी दोन्हीकडील कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले.



राज्यातील कायदा-सुव्यवस्था बिघडल्याचा आरोप करत महाविकास आघाडीचे कार्यकर्ते निदर्शने करण्यासाठी आले होते. त्यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा हातात घेऊन जोरदार घोषणाबाजी सुरू केली. तिथे राहुल गांधींचा निषेध करायला आलेल्या भाजपचे कार्यकर्त्यांनीही मग आक्रमक भूमिका घेतली. दोन्हींकडील कार्यकर्ते समोरासमोर ठाकल्याने काही चुकीचे घडण्याआधी पोलिसांनी दोन्हींकडील कार्यकर्त्यांना बाजूला केले. मात्र कार्यकर्ते ऐकायला तयार नव्हते.

अखेर दोन्ही गटांतील कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर तणाव निवळला. या वेळी केवळ आमचेच कार्यकर्ते पोलिसांनी ताब्यात घेतल्याचा आरोप मविआच्या पदाधिकाऱ्यांनी केला. मुख्यमंत्र्यांचा बंगला गुंडांचा अड्डा झाला असून, गृहमंत्री फडणवीस अकार्यक्षम आहेत. त्यांच्यामुळे गुंडांना संरक्षण मिळत असल्याचा आरोप मविआच्या कार्यकर्त्यांनी केला. दुसरीकडे काँग्रेस नेते राहुल गांधी हे कायम प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विरोधात बोलत असतात. त्यांचा अवमान करतात. त्यामुळे भाजप कार्यकर्त्यांनीही राहुल गांधींच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

# मनपाच्या दोन पर्पल टँकर्सचे उदघाटन



छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या हस्ते महापालिका मुख्यालयात १५ व्या वित्त आयोगातून खरेदी करण्यात आलेले दोन पर्पल टँकर चे उद्घाटन मनपा मुख्यालयात करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त सौरभ जोशी, कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) अमोल कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी अहमद तौसीफ, यांत्रिकी विभागातील कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

# महानगरपालिकेच्या कर समाधान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या संकलपनेतून छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिका मुख्यालय येथे आयोजित कर समाधान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील मालमत्ताधारकांना त्यांचे मालमत्ता कराबाबत आक्षेप /तक्रारी निकाली काढण्यासाठी व त्यांचे शंकेचे निरसन होऊन त्यांना कराचा भरणा सुलभतेने होण्यासाठी मा.आयुक्त तथा प्रशासक,छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका यांचे कडे दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत महानगरपालिका मुख्यालय येथे ङकर समाधान शिबिरङ आयोजीत करण्यात येत आहे.

सदर शिबिरामध्ये सबंधित मालमत्ता धारकांना त्यांच्या कराबाबत आक्षेप /तक्रारी असल्यास सबंधित प्रशासकीय (झोन ) कार्यालय मध्ये अर्ज दाखल करून कर समाधान शिबिरात उपस्थित राहता येणार आहे.

आज मनपा मुख्यालय येथे पहिल्या कर समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात सर्व १० प्रशासकीय कार्यालय अंतर्गत असंख्य नागरिकांची लक्षणीय उपस्थिती होती.

मला दुसऱ्यांपेक्षा जास्त कर लावण्यात आला आहे ,सारखेच बांधकाम आहे,माझी मालमत्ता ही व्यावसायिक नाही तरी आम्हाला व्यावसायिक कर लावण्यात आला अश्या विविध तक्रारी, व काही नागरिकांनी आमच्या मालमत्तेला कर लावावा अशी विनंती नागरिकांनी यावेळी मनपा आयुक्तांना केली. या तक्रारींची दखल घेऊन मा.आयुक्त महोदयांनी सदर मालमत्ता ही मीटर बील पासून तपासावी व छोट्या तक्रारी प्रशासकीय कार्यालय स्तरावर निकाली काढण्यात याव्यात.साधारणतः २० लाख पुढील प्रकरणे माझ्या कडे सादर करावीत असे उप आयुक्त व सर्व प्रशासकीय कार्यालय अधिकारी यांना आदेशित केले.



आयुक्त यांनी आदेशित केल्या प्रमाणे उप आयुक्त कर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्रशासकीय कार्यालय अधिकारी यांनी सोमवार ते शुक्रवार या कालावधीत नागरिकांच्या कर विषयक छोट्या तक्रारी निकाली काढण्यासाठी नियोजन केले आहे.

उदा.सोमवारी प्रशासकीय कार्यालय क्रं.०१ येथे सकाळी १०.३० वाजता . व त्याच दिवशी. प्रशासकीय कार्यालय क्रं.०२ येथे दुपारी ०४.०० वाजता.

तसेच मंगळवारी सकाळी १०.३० वाजता प्रशासकीय कार्यालय क्रं.०३ व दुपारी ०४.०० वाजता प्रशासकीय कार्यालय क्रं.०४ या प्रमाणे सर्व १० प्रशासकीय कार्यालय येथे नियोजन करण्यात आले आहे. मोठ्या प्रकरणांची मा.आयुक्त स्वतः सुनावणी घेणार आहेत.अशी माहिती उप आयुक्त अपर्णा थेटे यांनी दिली. माहे एप्रिल २०२४ नंतर मालमत्ता करात वाढ होणार असल्यामुळे आज नागरिकांची शिबिरात रीघ लागली होती. यावेळी हर्सूल पिसादेवी येथील एक नागरिक कर समाधान शिबिरात मालमत्ता कर लावावा म्हणून विनंती करायला आले असता मा.आयुक्त महोदयांनी त्यांचा शाल व गुलाब पुष देऊन प्रतिनिधिक स्वरूपात सत्कार केला.

महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने मालमत्ता कर व पाणी पट्टी भरणा करणे बाबत शहरातील नागरिकांना वेळोवेळी आवाहन करण्यात येत आहे.आज पहिल्याच कर समाधान शिबिरात नागरिकांनी उत्सफूर्तपणें आपला सहभाग नोंदवून आम्ही प्रशासनाच्या सोबत आहोत हे दाखवून दिले. यावेळी मा.उप आयुक्त अपर्णा थेटे,सर्व सहायक आयुक्त,कर्मचारी यांची उपस्थिती होती. जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे महापालिकेकडून आवाहन करण्यात येत आहे.

# निवडणूक प्रक्रिया राबवितांना सर्व विभागांमध्ये समन्वय आवश्यक-जी. श्रीकांत

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- निवडणूक प्रक्रिया राबवितांना सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. निवडणूक आयोगाने सर्व प्रक्रियांसाठी नियमावली व सुचना दिल्या आहेत, त्यांचे काटेकोर पालन करावे व समन्वय राखून कामकाज करावे,असे निर्देश प्रभारी जिल्हाधिकारी तथा मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज येथे दिले. जिल्हा नियोजन सभागृहात आज जी. श्रीकांत यांनी निवडणूक विषयक कामकाजाचा आढावा घेतला. जिल्ह्यात मतदान यंत्रे व त्यांच्यासाठी राखावयाच्या सुरक्षा उपाययोजना याविषयी उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके यांनी सादरीकरण करुन उपस्थितांना मार्गदर्शन केले. विधानसभा मतदारसंघनिहाय पोलीस अधिकारी व निवडणूक कर्मचारी यांचा समन्वय राखला जावा. ज्या ठिकाणीमतदार यंत्रे ठेवलेली आहेत तेथील सुरक्षा उपाययोजनांची चाचणी करावी. तेथील पाहणी करावी. तसेच मतदारसंघनिहाय संवेदनशील मतदान केंद्र इ. ची नोंदणी करावी, असे निर्देश जी. श्रीकांत यांनी दिले. बैठकीस जिल्ह्यातील तहसिलदार, पोलीस दलातील अधिकारी आदी उपस्थित होते.


## कार्यालय नगर परिषद वैजापूर, जि.छ. संभाजी नगर

दुरध्वनी क्र. ०२४३६-२२३१४५/
E-Mail ID: npvaijapur@gmail.com/
coud.vaijapur@maharashtra.gov.in

जा.क्र./न.प.वै/कावि-४/२०२४/२५९ दिनांक:०९/०२/२०२४

**शुद्धिपत्रक**
**जाहीर ई-लिलाव सूचना**

वैजापूर नगर परिषद जिल्हा छत्रपती संभाजीनगर हद्दीमध्ये असणाऱ्या आठवडी बाजार जमीन भाडे व भाजी मंडई जमीन भाडे फी वसुली जाहीर ई- लिलाव सूचना मर्यादा कालवधी १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालवधी पर्यंतचा जाहीर ई-लिलाव प्रगटन.

वैजापूर नगर परिषद जिल्हा छत्रपती संभाजीनगर हद्दीमध्ये असणाऱ्या आठवडी बाजार जमीन भाडे भाजी मंडई जमीन भाडे वसुली लिलाव दि. ०९/०२/२०२४ ते दि. १५/०२/२०२४ पर्यंत मागवण्यात येत आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | ई-लिलावाचा प्रकार | शासकीय बोली | निविदा फी | अनामत रक्कम | ई-लिलाव ऑनलाईन दाखल करणे दिनांक | (DD) जमा करण्याचा कालावधी | ई-लिलाव दस्ताएवाजाची तपासणी (App-roval) | ई-लिलाव दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भाजी मंडई जमीन भाडे वसुली | ८०००००/- | १०००/- | २५०००/- | १५/०२/२०२४ सायंकाळी ५ वा. पर्यंत | १५/०२ २०२४ सायंकाळी ५ वा.पर्यंत | १६/०२/२०२४ | २०/०२/२०२४ | सकाळी ११ ते सायंकाळी ५ पर्यंत |
| २ | आठवडे बाजार जमीन भाडे वसुली | ६०००००/- | १०००/- | २५०००/- | १५/०२/२०२४ सायंकाळी ५ वा. पर्यंत | १५/०२ २०२४ सायंकाळी ५ वा.पर्यंत | १६/०२/२०२४ | २०/०२/२०२४ | सकाळी ११ ते सायंकाळी ५ पर्यंत |

टीप - लिलावाच्या अटी व शर्ती न.प. कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वा. वेळात श्री.एम.एन.साळवे यांचेकडे तसेच नोटीस बोर्डवर पाहावयास मिळेल.

**स्वाक्षरीत/ -**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वैजापूर**


# एचआयव्ही एड्सच्या समूळ उच्चटनसाठी शिक्षकांची भूमिका महत्वपूर्ण असणार-धोंडीरामसिह राजपूत

वैजापूर दि.१० (प्रतिनिधी)- देशात युवा वर्गात वाढत असलेले एचआयव्ही एड्सचे प्रमाण २०३०वर्षापर्यंत शून्यवर आणून देश एचआयव्ही एड्स मुक्त करण्यासाठी येत्या काळात सर्व थरावरील शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्वाची ठरणार आहे,त्या साठी शिक्षकांनी सामाजिक बांधीलकी जपत एचआयव्ही एड्स बाबत जनजागृती साठी सहकार्य करण्याचे आवाहन सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी तथा जिल्हा आरोग्य समिती समिती चे सदस्य धोंडीरामसिंह राजपूत यांनी शिक्षक संवेदीकरणं कार्यक्रमात येथील करुणा निकेतन विद्यालयात शुक्रवार



(ता.०९)रोजी केले. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी मुंबई,जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग ,जिल्हा रुग्णालय औरंगाबाद, व उपजिल्हा रुग्णालय वैजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'शालेय शिक्षकांचे संवेदीकरण'या कार्यक्रमात राजपूत बोलत होते,ते पुढे म्हणाले की, शिक्षकांनी आपल्या अध्ययन व अध्यापन सोबत या दुर्धर आजाराची माहिती युवा विद्यार्थी वर्ग यांना देऊन समाजात ही जनजागृती करून सामाजिक बांधिलकी जपावी. डॉ. दयानंद मोती पवळे,जिल्हा शल्य चिकित्सक.डॉ सुधाकर मुळे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी साधना गंगावणे यांच्या मार्गदर्शनखाली हा कार्यक्रम जिल्हा भर राबविण्यात येत आहे. जिल्हा पर्यवेक्षक संजय पावर यांनी ही शिक्षकांना मार्गदर्शन करताना एचआयव्ही एड्स बाधित होण्याची चार कारणे अनेक उदाहरणे देऊन विशद केली व एचआयव्ही एड्स टाळण्यासाठी ची ही चार उदाहरणे देऊन शिक्षकानी या बाबत समाजात व युवा वर्गात जागृती करण्याचे आवाहन केले,या प्रसंगी शिक्षक काकासाहेब ढेपले यांनी सूत्र संचलन केले तर केंद्र प्रमुख मनोज गव्हाणे यांनी आभार मानले. या प्रसंगी उपजिल्हा समुपदेशक विजय पाटील,राजेंद्र लाठे,बापू वाळके,सुनीता माने यांनी सहभाग नोंदविला,गट शिक्षणाधिकारी हेमंत उशीर,विस्तार अधिकारी मनीष दिवेकर, बाळासाहेब म्हस्के तसेच शिक्षक रमेश बागुल,बाबासाहेब जगताप, श्री, शिंदे, श्री,वाघ,श्री राठोड यांनी ही सहकार्य केले.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co.Ltd.

## E-TENDER (RFx) NOTICE

Notice for submission of online bids (RFx) for following.

| | RFx/Tender No. & Description |
|---|---|
| | RFx No. 7000029433(Second Call)<br>Supply of 50kL Uninhibited naphthenic base high grade mineral insulating oil to carry various O&M activities at different substation under EHV PC O&M Zone Chhatrapati Sambhajinagar.<br>Estimated Cost: - Rs 46,49,200/-Only (Including GST & Labor cess)<br>EMD- Rs. 46,492/-<br>Tender Fees:- Rs 500/- (Including GST) |
| For further details, visit our Website https://srmetender.mahatransco.in | |

Sd/-
Chief Engineer EHV PC &
O&M Zone MSETCL
Aurangabad.



Government of Maharashtra, India
Public Works Department

**कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय**

पदमपुरा परीसर, छत्रपती संभाजीनगर- ४३१००५
ई-मेल- Aurangabad.ee@mahapwd.gov.in
दुरध्वनी ०२४०-२३३१०२२

**सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई शासन शुध्दीपत्रक क्रमांक सीएटी/२०१७/प्रक्र ०८/ इमा-२ दिनांक -२९/६/२०१७**
**ई निविदा सूचना क्र. २५२ सन २०२३-२४**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद (दुरध्वनी क्रमांक ०२४०-२३३११७४) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम यांच्या कडुन (१५) कामाकरिता योग्य त्या वर्गातील शासन नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून ई-निविदा बी-१ / नमुन्यातील (ऑनलाईन) प्रणालीव्दारे मागविण्यांत येत आहे.

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे,
अ) http://mahapwd.gov.in
ब) https://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यांत येईल)
क) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांचे कार्यालयातील सुचना फालक

स्वाक्षरीत/ -
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग
छत्रपती संभाजीनगर

डीजीआयपीआर/२०२३-२०२४/८०३८


# इयत्ता १० वी १२ वी परीक्षा कालावधीत मनाई आदेश

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)-महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त (इ.१० वी) व उच्च माध्यमिक (इ.१२ वी) प्रमाणपत्र परीक्षा दि.२१ फेब्रुवारी २०२४ ते २६ मार्च २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. या कालावधीत जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रावरील परीक्षा शांततेच्या वातावरणात पार पडाव्या व कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी परीक्षा कालावधीमध्ये महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) आणि ३७ (३) चे आदेश लागू करण्याचे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी प्रभोदय मुळे यांनी दिले आहेत. या कालावधीत सार्वजनिक कार्यक्रम, मिरवणूक,सभा यांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच पेक्षा जास्त जमण्यासाठी सभा, मिरवणुका मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील (ग्रामीण) जिल्हा पोलीस अधीक्षक आणि तसेच पोलीस अधिक्षक छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील. या आदेशाचा भंग करणाऱ्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

(पान १ वरुन)

## 'निर्भय बनो' सभेला विरोध...

कार्यकर्तेही आक्रमक झाले आहेत. महाविकास आघाडीच्या तरुण कार्यकर्त्यांनी या हल्ल्याच्या विरोधात आंदोलन पुकारलं आहे. हल्ला करणाऱ्यांनी निखिल वागळे यांच्या समर्थकांवर अंडे फेकल्याचा दावा आंदोलकांनी केला आहे. हल्ला झाला तेव्हा निखिल वागळे, वकील असीम सरोदे हे गाडीतच होते. ते त्याच गाडीने कार्यक्रमस्थळी आले आणि सभेला उपस्थित राहीले. भाजपच्या आंदोलकांकडून दगडफेक करण्यात आल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या आंदोलकांनी केला आहे.

दरम्यान झालेल्या राड्यानंतर पुण्यामध्येच असलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आत्ताच हा प्रकार झाल्याचं मला समजल्याची प्रतिक्रिया दिली. मी तेथील पोलीस आयुक्तांशी लगेच बोलणार असून कडक कारवाई करायला सांगणार आहे. जो कोणी दोषी असेल त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल असे त्यांनी म्हटले आहे.


## नगर परिषद वैजापूर

फोन नं. ०२४३६-२९५०३६ इ-मेल आयडी- npvaijapur@gmail.com
जा.क्र./नपवै/कावि/विवि/२०२४/ दि. ०९/०२/२०२४

वैजापूर नगर परिषद न.प. फंड व इतर शासकीय निधी अंतर्गत खालील दर्शविलेल्या कामासाठी अनुभवी नोंदणीकृत कंत्राटदाराकडून निविदा/दरपत्रक मागवीत आहे. कोरे निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून दि. १९/०२/२०२४ पर्यंत कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत खालीलप्रमाणे निश्चित किंमत जमा केल्यानंतर न.प. कार्यालयात पाणीपुरवठा विभागाकडे विकत मिळतील.

१) कंत्राटदाराने मोहोरबंद निविदा दोन लिफाफा पद्धतीत मुख्याधिकारी नगर परिषद वैजापूर यांच्याकडे दिनांक १९/०२/२०२४ रोजी दुपारी ०५.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात. २) निविदासोबत बयाना रक्कम रोख जमा करणे आवश्यक आहे. यासाठी धनादेश अथवा दर्शनी हुंडी स्वीकारली जाणार नाही. ३) जमा केलेल्या बयाना रकमेचा पावती क्रमांक सीलबंद लिफाफ्यावर नमूद करावा. बयाना रकमेशिवाय निविदा स्वीकारली जाणार नाही. ४) प्राप्त झालेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी ठीक ०५.०० वाजता मा. मुख्याधिकारी यांच्या दालनात समक्ष उघडण्यात येतील. ५) मान्य निविदा धारकाच्या बिलातून अनामत, आयकर, GST, कामगार उपकर इ. बाबींची रक्कम नियमानुसार कपात करण्यात येईल. ६) इतर अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून विद्युत विभागात पहावयास मिळतील. ७) भारत सरकार राजपत्र दि. ०८-०१-२०११ नुसार EPF रजिस्ट्रेशन बंधनकारक राहील. ८) कोणतीही निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार न.प. ने राखून ठेवला आहे.

**कामाचा तपशील खालीलप्रमाणे**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | बयाना रक्कम | अनामत रक्कम | निविदा फोर्म फीस | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रामगिरी नगर येथे LT पोल उभारणी करुन वीज तारा ओढणे. | १,९७,१३४/- | ३,४००/- | १५,७७०/- | ५००/- | ८ दिवस |
| २ | येवला रोडवरुन वाघ वस्तीकडे जाणाऱ्या रस्त्यावर येथे LT पोल उभारणी करुन वीज तारा ओढणे. | ४,४२,६०२/- | ८,९००/- | ३५,४०८/- | ५००/- | ८ दिवस |
| ३ | मुस्तफा पार्क येथील ट्रान्सफॉर्मर शिफ्टींगचे काम करणे. | ४,०३,४९३/- | ८,१००/- | ३२,२८०/- | ५००/- | ८ दिवस |
| ४ | पंप हाउस मोटर दुरुस्तीचे काम करणे. | -- | १,०००/- | --- | --- | ८ दिवस |

स्वाक्षरीत/-
**विद्युत अभियंता**
**वैजापूर नगर परिषद**

स्वाक्षरीत/-
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**वैजापूर नगर परिषद**